दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ५ वे अंक १ ला शुक्रवार दि.२७ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## पत्रकारांनी समाजासमोर वास्तव मांडण्याचा प्रयत्न करावा
## रेणापूर येथील कार्यक्रमात आ. रमेशआप्पा कराड यांचे प्रतिपादन





लातूर : – समाजाचा विश्वास पत्रकारावर आणि त्यांच्या लेखणीवर आहे लेखणी दर्जेदार असायला हवी. पत्रकारांच्या लेखणीत ताकत आणि वास्तव मांडण्याची क्षमता असली पाहिजे. समाजातील एकोपा आपुलकी आणि विश्वास कायम टिकून राहिला पाहिजे यासाठी पत्रकारांनी काम करावे असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर येथील पत्रकारांच्या कार्यक्रमात बोलताना केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई या संघटनेच्या रेणापूर तालुका शाखेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त पत्रकारांना किटचे वाटप आणि सन्मान सोहळा गुरुवारी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे हे होते तर याप्रसंगी पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत रेणापूरचे गटविकास अधिकारी सुमित जाधव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतीक लंबे यांच्यासह भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे नवनाथ भोसले, माजी सभापती अनिल भिसे, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, शरद दरेकर, अभिषेक आकनगिरे, महेंद्र गोडभरले, श्रीकृष्ण जाधव, बाबासाहेब घुले, अनुसया फड यांच्यासह पत्रकार संघाचे रेणापूर तालुका अध्यक्ष शरद राठोड, जिल्हा संघटक सुधाकर फुले, विष्णू आचार्य यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होती.

प्रारंभी छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून मराठवाडा भूषण पत्रकार पुरस्कार प्राप्त जयप्रकाश दगडे, युपीएससी परीक्षेतील यशस्वी कु. संपदा धर्मराज वांगे आणि मंत्रालयातील विधी विभागाचे अवर सचिव सचिन कस्तुरे यांच्या मातापित्यांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला यावेळी पत्रकारांना विविध साहित्याचे किट वितरित करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त संजय विरुळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. आ. कराड यांच्या सूचनेवरून पानगाव येथे पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सुकेश भंडारे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी ज्या भागाचे नेतृत्व केले त्या रेणापूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य मला लाभले असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर तालुक्यातील पत्रकारांकडे कधीच पत्रकार म्हणून पाहत नाही तर त्यांना मी परिवाराचा सदस्य मानतो. रेणापूर येथे जागा उपलब्ध करून दिल्यास वर्षभरात पत्रकार भवनाची उभारणी करून देईल अशी ग्वाही दिली.

पत्रकार हा समाजाचा दिशादर्शक आहे वास्तव समाजासमोर मांडण्याच काम करतात चांगल्या रूढी, परंपरा बरोबरच समाजातील दोष, अवगुण समाजासमोर आणणाऱ्या पत्रकारांनी ठरविले तर वाईटाचे चांगले आणि चांगल्याचे वाईटही होऊ शकते. स्पर्धेच्या युगात सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या काळात लेखणी किती चालणार, कशी चालणार यासाठी पत्रकारांना आधार देण्याची गरज आ. कराड यांनी बोलून दाखविले. रेणापूर तालुक्यातील पत्रकारांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू अशीही त्यांनी ग्वाही दिली.

रेणापूर तालुक्यातील पत्रकारांनी आज पर्यंत अनेक अभिनव आणि लोकहिताचे उपक्रम राबवले असल्याचे सांगून ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे म्हणाले की, समाजातील सत्य, शिव, आणि सुंदर याचा पत्रकारांनी पाठपुरावा करावा असे बोलून दाखविले तर पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे यांनी पत्रकार संघाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती देवून लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यानंतर रमेशआप्पा कराड हेच आमच्यासाठी राजश्री शाहू महाराज आहेत असे बोलून दाखवले.

प्रारंभी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष शरद राठोड यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू आचार्य यांनी केले तर शेवटी मधुकर गालफाडे यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार संघाचे अनिल फुलारी, वाल्मीक केंद्रे, सतीश जाधव, तुषार जोगदंड, वसंत सूर्यवंशी, बाळया स्वामी, योगेश मोरे, माणिक मुंडे, उमेश जोशी, संजय माकेगावकर, गोपाळ चिताडे त्याचबरोबर भाजपाचे चंद्रकांत कातळे, गणेश तूरूप, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, दिनकर राठोड, श्रीमंत नागरगोजे, विजय चव्हाण, राम मोरे, माधव घुले, शेख अजीम, हनुमंत भालेराव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळणी येथे छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



औसा: औसा तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद शाळेत छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच शाहूराज प्रताळे आणि उपसरपंच सत्यवान जाधव हे उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवर आणि शाळेतील शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थी दिव्या बसुळे, प्रणव भुजबळ, धनश्री पांचाळ, संध्या प्रताळे, आयान शेख, अनुष्का कांबळे, महेश लंजारे या विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या विषयी आपले विचार मांडले. शाळेतील शिक्षक अनिल कांबळे, रवि कुरील यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सत्यप्रकाश भोसले ,हरीश बोने, रवी कुरील, अनिल कांबळे, पालक अमोल कांबळे, श्रीमती सुवर्णा कोळसुरे, रंजना हादवे सोनारी गिरी मॅडम सह विद्यार्थी उपस्थित होते.

## १९७५ सालची आणीबाणी संविधानाच्या चोकटीत, तर सध्या संविधानाची पायमल्ली करून अघोषित आणीबाणी : सुभाष निंबाळकर




लातूर : १९७५ ते ७७ या कालावधीत स्व पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. त्याविरुद्ध स्वामी अग्निवेश यांच्या नेतृत्वाखाली भूमिगत राहून आम्ही काम करत होतो. आम्ही त्याकाळी तुरुंगवास भोगला. पण ती आणीबाणी कायद्याच्या चौकटित होती. आजच्या संघ आणि भाजप सरकारच्या काळात अघोषित आणीबाणी आहे. असे मत लोकतंत्र सेनानी सुभाष निंबाळकर यांनी लातूर येथे व्यक्त केले. आणीबाणीच्या काळात बंदिवास भोगलेल्या नागरिकांचा प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव करण्यात आला. त्यावेळी सुभाष निंबाळकर बोलत होते. आणीबाणीतील कटू अनुभव कोर्टाच्या पुराव्यासह त्यांनी विषद केले. त्यांनी त्याकाळी भूमिगत राहून काम करीत असताना संघिष्ट, समाजवादी, डाव्या विचारसरणीच्या लोकांनी संगनमत करून निलंगा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून आम्हा चार लोकांना पकडून दिले होते. आजही माझ्याकडे त्याबाबतचे कोर्टाचे पुरावे उपलब्ध आहेत. असे त्यांनी सांगितले. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठीचा तो लढा होता. आजच्या सरकारच्या काळात त्या आणीबाणी पेक्षाही भयानक अशी अघोषित आणीबाणी आहे. असे मत निंबाळकर यांनी मांडले. यावेळी आणीबाणीच्या काळात बंदिवास भोगलेल्या लोकतंत्र सेनांनीना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संगीता टकले, केशव नेटके, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकट रावलोड, तसेच आणीबाणीच्या काळात बंदिवास भोगलेले माजी आमदार मनोहर पटवारी, प्रदीप पाटील खंडापूरकर, अनिल आंदोरीकर, अशोक मठपती आदींची उपस्थिती होती. लोकशाही आणि संविधान रक्षणासाठी ज्यांनी ज्यांनी लढा दिला त्यांच्याबद्दल कृतज्ञता प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांनी शिल्पा करमरकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय सूर्यवंशी यांनी केले.

## व्ही एस पँथर्सच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



लातूर: व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाहू चौक येथील पूर्ण कृती पुतळ्याला संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी जेष्ठविधीज्ञ उदय जी गवारे , संपर्कप्रमुख आनंद जाधव , कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे, ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मणियार, असित कांबळे, अजय सूर्यवंशी, सह आदि उपस्थित होते

## घनकचरा व्यवस्थापन कामाची मनपा आयुक्तांकडून पाहणी कचरा संकलन केंद्रांना भेटी







लातूर /प्रतिनिधी :मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी (दि. २५) घनकचरा व्यवस्थापन कामाची पाहणी केली. बायोगॅस प्रकल्प, कचरा संकलन प्रकल्प येथे भेटी देऊन संबंधितांना त्यांनी सूचनाही केल्या.

आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी शहरातील फ्रुट मार्केट येथील १ टन बायोगॅस प्रकल्प, गांधी चौक येथील १ टन बायोगॅस प्रकल्प, गुळ मार्केट परिसरातील तसेच टाऊन हॉल परिसरातील कचरा संकलन केंद्रासह शासकीय कॉलनी परिसरातील कचरा संकलन केंद्राचीही पाहणी केली. यावेळी त्यांनी दैनंदिन कामाचे वर्कशीट रजिस्टर ठेवून त्याची स्वच्छता निरीक्षकांमार्फत तपासणी करून घेण्याचे आदेश संबंधित कंत्राटदारांना दिले. स्वच्छता निरीक्षकांनी कचरा संकलन केंद्रावर येणाऱ्या घंटागाड्यांची फेरीनिहाय दैनंदिन तपासणी करावी.दररोजचा अहवाल स्वच्छता विभागास सादर करावा,असे आदेशही त्यांनी दिले.

श्रीमती मानसी यांनी प्रभाग क्रमांक १५ मध्ये कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीची शिवाजीनगर भागात पाहणी केली. कचरा संकलन किती वाजता सुरू केले? पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या खेपेची नोंद, वेळा यांची वर्कशीटला नोंद घेण्यासंदर्भात स्वच्छता निरीक्षकांना आदेश दिले. वरवंटी येथील कचरा डेपो परिसरातील खत प्रकल्पाची पाहणीही आयुक्तांनी केली. प्रकल्पावर येणारा ओला, सुका आणि एकत्रित कचऱ्याचे वजन व रेकॉर्डची पाहणी केली. कचरा प्रोसेसिंग करणारा १५० टन क्षमतेचा प्लांट एक महिन्यात पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे आदेश त्यांनी कंत्राटदारास दिले.

प्रोसेसिंग मशीन व खत प्रकल्पाची पाहणी करून घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ प्रमाणे अंमलबजावणी करावी असे त्यांनी सांगितले. बायोमायनिंग कचऱ्यावर प्रक्रियेचे काम यावेळी आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्यात आले. या कामाचे कार्यादेशही आयुक्तांनी दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## भाषासक्तीचे कवित्व

भाषा ही केवळ संवाद साधण्याचे माध्यम नाही, तर ती संस्कृती आणि परंपरेचाही भाग आहे. मातृभाषेमुळे मुलांना त्यांच्या संस्कृतीशी जोडले जाण्यास मदत होते, असे आचार्य विनोबा भावे यांनी म्हटले आहे. त्यांच्या दृष्टीने मातृभाषा ही शिक्षणाची आणि संस्कृतीची आधारशिला होती. केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून 'सर्वसाधारणपणे' हिंदी शिकावी लागेल, असे धोरण महायुती सरकारने घोषित केले. त्यास राज्यात तीव- विरोध होत असल्याचे लक्षात घेऊन, त्रिभाषा सूत्रासंदर्भात संबंधितांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. मराठीतील साहित्यिक, भाषातज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, राजकीय नेत्यांशी विचारविनिमय करूनच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे सरकारचे धोरण आहे.

वास्तविक, शाळांना सुटी असतानाच सल्लामसलतीची प्रक्रिया झाली असती, तर वादही टळला असता आणि शाळा उघडण्यापूर्वीच निर्णय झाला असता. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन आठवडा लोटला असून, अंतिम निर्णय केव्हा होणार, याबाबत शैक्षणिक वर्तुळात संभ-माचे वातावरण आहे. केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र देशातील बहुतेक राज्यांनी स्वीकारले. केरळमध्ये ७१ टक्के, कर्नाटकात ७६ टक्के, गुजरातमध्ये ९७ टक्के आणि पंजाबात ९६ टक्के शाळांमध्ये त्रिभाषा धोरण लागू आहे. शिक्षणात केवळ भाषिक समावेशन वाढवण्यासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या बहुभाषिक क्षमतेच्या विकासार्थ आखलेले हे सूत्र आहे. त्यामधून राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी, राष्ट्रीय दृष्टिकोन तयार व्हावा, असाही उद्देश आहे. फक्त राज्य मंडळांतच नव्हे, तर महाराष्ट्रातील सीबीएसई आणि आयबी या शैक्षणिक मंडळांमध्ये पहिल्या वर्गापासून तीन भाषा शिकवल्या जातात.


आयबी मंडळाच्या शाळांमध्ये प्राथमिक वर्षाच्या अभ्यासक्रमात मराठी, इंग्रजी आणि एक पर्यायी भाषा शिकवण्याची पद्धत आहे, तर सीबीएसई शाळांमध्ये मराठी ही मातृभाषा म्हणून शिकवली जाते आणि त्यासोबत इंग्रजी व हिंदीही शिकवण्यात येते; मात्र महाराष्ट्र सरकारने त्रिभाषा सूत्र स्वीकारून पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी प्रथम सक्तीची केली आणि नंतर ती 'ऐच्छिक' बनवली. हा राज्याच्या हिंदीकरणाचा डाव असल्याचा आरोप करत याला मनसे, उद्धव ठाकरेंची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस तसेच काँग्रेसने विरोध केला; पण हा केवळ राजकारणाचा विषय नसून मुलांच्या भवितव्याचा आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. हिंदी भाषेसंबंधीच्या निर्णयास स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने १७ जून रोजी शाळांना दिलेले वेळापत्रक आणि तिसरी भाषा सक्तीचे आदेश अद्याप लागूच आहेत. त्यामुळे या आदेशाची अंमलबजावणी होणार की कसे, यावर प्रश्नचिन्ह आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे त्यावर तज्ज्ञांशी चर्चा करणार आहेत. शिवाय ३० जूनपासून विधिमंडळाचे अधिवेशन आहे. तेव्हा या मुद्द्याकडे सभागृहात लक्ष वेधले जाईल. तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकणे ऐच्छिक असले, तरीही तिसरी भाषा शिकवण्यात अनेक समस्या आहेत. तिसरी भाषा शिकण्यासाठी शाळेत किमान २० विद्यार्थी नसतील, तर ती ऑनलाईन शिकवण्याची व्यवस्था करावी लागेल. त्यासाठी शाळेत संगणक, स्क्रीन्स तसेच इंटरनेटची यंत्रणा आवश्यक आहे. ही सोय असली, तरीही तासिकेच्या वेळेत शिक्षक ऑनलाईन उपलब्ध असणे आवश्यक आहे. पहिलीचे विद्यार्थी तर सहा वर्षांचे असतात आणि ऑनलाईन शिक्षण घेत असताना त्यांचे लक्ष अध्ययनात केंद्रित ठेवणे तसेच ऑनलाईन माध्यमातून त्यांना प्रत्येक गोष्ट समजावणे सोपे नाही. शिवाय एकाच इयत्तेतील विद्यार्थ्यांनी दोनपेक्षा अधिक भाषा तिसरी भाषा म्हणून निवडल्यास त्यांच्या अध्यापनाची सोय करणे, हेही कठीण आहे.

एखाद्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या जास्त असेल, तिसरी भाषा शिकवण्यासाठी एकापेक्षा जास्त कंत्राटी शिक्षक नेमावे लागतील. त्या त्या भाषेनुसार कंत्राटी शिक्षकांची उपलब्धता असणे, त्यांची निवड व नेमणूक करणे, या गोष्टी लवकर न झाल्यास अध्ययन आणि अध्यापनात अडचणी निर्माण होणार आहेत. मुळात पहिलीच्या मुलांना ऑनलाईन पद्धतीने शिकवणे घातक ठरू शकेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण देणे भाग पडले; पण त्यावेळी असंख्य मुलांना विषयाचे आकलन झाले नव्हते. तसेच स्क्रीनच्या व्यसनातून मानसिक आरोग्याच्या समस्याही निर्माण होऊ शकतात. खरे तर, पहिली ते चौथीपर्यंत एकच भाषा म्हणजे मातृभाषा असायला हवी. दोनसुद्धा नकोत. तसेच वयाच्या सहाव्या ते दहाव्या वर्षांपर्यंत खेळता खेळता शिकायचे असते. शिकता शिकता खेळणे नव्हे, असे मत प्रख्यात नाटककार महेश एलकुंचवार यांनी व्यक्त केले आहे.

मुळात राज्यातील अनेक शाळांत पुरेसे शिक्षकच नाहीत, हे सरकारने लक्षात घेतले आहे का? वास्तविक हिंदीच काय, कोणतीही भाषा शिकणे हिताचेच असते. देशातील लाखो तरुण-तरुणी केवळ भारतीय नव्हे, तर स्पॅनिश, जर्मन, फ्रेंच, जपानी अशा परकीय भाषाही शिकत असतात. त्यामुळे भाषा शिकणे हे नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने उत्तमच; पण तो आनंदाचाही भाग असतो आणि त्यामुळे अधिक माणसांशी संवाद साधता येतो. दुसरीकडे महाराष्ट्रात मराठी ही शाळेत सक्तीची केली असली, तरीही अनेक शाळांत ती शिकवलीच जात नाही. खासकरून इंग्रजी शाळा व खासगी शाळांमध्ये मराठी शिकवली जात आहे की नाही, हेसुद्धा पाहिले जात नाही. शिवाय सीबीएसई आणि आयसीएसईच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे की नाही, हे पाहिले पाहिजे. खरे तर, मुलांच्या प्राथमिक टप्प्यात त्यांच्यावर भाषेचे जे संस्कार होत असतात, ते त्यांच्या दृष्टीने जीवनभरासाठी मोलाचे असतात. नवी भाषा शिकणे आणि मातृभाषेतून विचार करणे या दोन पूर्णपणे वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

# कलाल-कलार समाजाचे भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाचे घोडे कुठे अडले!

राज्यात काही समाजांनी कोणताही संघर्ष न करता त्यांना तडकाफडकी आर्थिक विकास महामंडळ प्राप्त झाले यांचेही आम्ही स्वागत करतो. कारणं यामुळे समाजाचा विकास होईल मग तो कोणताही समाज असो.परंतु गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना आर्थिक विकास महामंडळासाठी संघर्ष करीत आहे व शासन दरबारी मागणी करीत आहे परंतु सरकार यावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.कलाल-कलार समाजाला भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथराव शिंदे,अतुलजी सावे यांना लेखी निवेदन सुध्दा देण्यात आले. सोबतच इतरही मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आणि याबद्दल चर्चा सुध्दा झाली व त्यांनी ठोस आश्वासन सुध्दा दिले तुमच्या समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे त्यामुळे कलाल- कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.परंतु सरकार तर्फे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अधिकृत कारवाई किंवा हालचाली अजून पर्यंत सरकार मार्फत करण्यात आलेली नाही याची खंत व दु:ख समाजाला आहे. समाजाने मंत्री महोदयांना समक्ष निवेदन दिलेच सोबतच मेल व्दारे अनेक पत्र व्यवहार सुध्दा केले परंतु कलाल-कलार समाजाच्या हाती निराशा आली.एककीकडे सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळापासुन डावलत आहे तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या समाजाचे आर्थिक विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे.याची आम्हाला खंत वाटते. कोणताही समाज असो प्रत्येक समाजाचा विकास व्हायलाच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नेहमीच स्वागतच करीत आली आहे. सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले याचे स्वागतच.या महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले महामंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काय-काय करता येईल यावर गांभीर्याने विचार करून समाजाच्या प्रती विकासाची गती वाढविण्याचे काम करीत आहेत.दिनांक २२ जून २०२५ ला कराड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सभेत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन उभारण्याची घोषणा केली सोबतच




पारंपरिक व्यवसाय (पौरोहित्य )करणाऱ्यांना संधी देण्याकरिता पुढील पाऊल उचलण्याचे त्यांनी जाहीर केले.दामलेंच्या कार्याचे आम्ही स्वागत करतो कारण ते समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.हीच संधी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेला सरकार का देत नाही? आम्हालाही वाटते की प्रत्येक जिल्ह्यात भगवान सहस्त्रार्जुन भवन बनावे व याचा फायदा समाजातील तळागाळातील गरीब समाज बांधवांना व्हावा.परंतु कलाल-कलार समाजाच्या प्रती सरकारचे घोडे कुठे अडले अजुन पर्यंत समजले नाही! आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत पहिला हक्कदार कलाल-कलार समाज होता.परंतु सरकारने आर्थिक विकास महामंडळापासुन डावलल्याने समाज विकासापासुन दुरावल्या जात आहे.आज कलाल-कलार समाज अत्यंत मागासलेला आहे.कारण पारंपारीक व्यवसायांचा विचार केला तर फक्त १ टक्का पारंपरिक (मद्य) व्यवसाय आमच्या समाजाजवळ आहे व ९९ टक्के व्यवसाय पुंजीपती लोकांजवळ आहे त्यामुळे समाज पारंपरिक व्यवसायापासुन आजही कोसो दूर आहे.परंतु आज ९९ टक्के समाज बांधवांचे काय होईल याचा विचार सरकारने केला पाहिजे.समाजाच्या व्यथा आम्ही मंत्रीमहोदयांना समक्ष सांगितल्या सोबतच अनेक निवेदने सुध्दा दिलेत परंतु सरकार कलाल-कलार समाजाच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जात आहे. आताही वेळ गेलेली नाही सरकारने कलाल-कलार समाजाच्या व्यथा समजून घ्याव्यात व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना करण्यात येत आहे.माननीय देवेन्द्रजी फडणवीस अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत यामध्ये मुख्यत्वेकरून आणिबाणीच्या काळातील बंदिवानांची पेंशन दुप्पट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे याचे स्वागतच याच धर्तीवर कलाल-कलार समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण एक पाऊल पुढे टाकुन कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाचा विकासाचा मार्ग मोकळा करावा अशी आग्रहाची विनंती संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.

******

आपला
रमेश लांजेवार ( प्रदेश प्रवक्ता )
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# पावसाळा आणि घ्यावयाची काळजी

राज्यात येत्या शनिवारपर्यंत कोकणात तसेच घाटमाथ्यावर अतिमुसळधार, मध्य महाराष्ट्रात मुसळधार, मराठवाड्यात हलका ते मध्यम, तर विदर्भात यलो अलर्टसह वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. दरम्यान, गेल्या चोवीस तासात राज्यातील काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली.

पावसाळ्यात डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढतो. यासाठी पाणी साचू न देणे, अस्वच्छता बाळगणे यासारख्या गोष्टी घातक ठरते. अस्वच्छतेमुळे अन्नातून विषबाधा संभवते. त्यामुळे ताजे अन्न खावे, पाणी उकळून प्यावे. लहान मुले, वृद्धांची विशेष काळजी घ्यावी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपाय करावे. राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरू आहे. पावसामुळे लोकांची उकाड्यापासून सुटका झाली आहे. पण काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.

पावसाळ्यात अनेक आजार होण्याची शक्यता असते. पावसाळा सुरू झाला की डासांची संख्या वाढते. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनियासारख्या आजारांचा धोका वाढतो. पाणी साचल्यामुळे डास आणखी वाढतात आणि माणसांसाठी ही गोष्ट त्रासदायक ठरते. पावसाळ्यात तापमानात चढ-उतार होतो. हवेतील आर्द्रता वाढते. त्यामुळे व्हायरस आणि बॅक्टेरिया वाढतात. परिणामी व्हायरल इन्फेक्शन, ताप, सर्दी-खोकला असे त्रास सुरु होतात.

पावसाळ्यात भिजल्याने आपली रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यामुळे पावसात भिजणं टाळावं. जेणेकरून तुमचं आरोग्य बिघडणार नाही. आरोग्याशी निगडित कोणताही त्रास जाणवल्यास तातडीने डॉक्टरांना भेटावे. तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात आर्द्रता आणि अस्वच्छतेमुळे अन्न लवकर खराब होतं. त्यामुळे अन्नातून विषबाधा, अतिसार आणि टायफॉइडसारखे आजार होतात. या आजारांपासन बचावासाठी बाहेरचं फास्ट फूड खाणं टाळावे, घरचं ताजं अन्न खावे. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. पाणी फिल्टर करून किंवा उकळूनच प्यावे. पावसाळ्यात त्वचेवर पुरळ येणे, खाज सुटणे आणि फंगल इन्फेक्शन असे त्रास होण्याची शक्यता असते.

अंडरआर्म्स, पाय, आणि कमरेच्या भागात घाम साचल्यामुळे फंगल इन्फेक्शन वाढतं. फंगल इन्फेक्शन होऊ नये, यासाठी कॉटनचे कपडे घालणे, शरीर कोरडे ठेवणे, अँटी-फंगल पावडर किंवा क्रीमचा वापर करणे यासारख्या गोष्टींचा अवलंब करावा. पावसाळ्यात अनेक लोकांना गुडघेदुखी आणि कंबरदुखीचा त्रास जाणवतो. या ऋतूमध्ये सांधेदुखी आणि सूज वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यायाम करावे. गरम पाण्याचा शेक घ्यावा आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घ्यावे. लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते. त्यामुळे ते लवकर आजारी पडतात.

मुलांना साचलेल्या पाण्यापासून दूर ठेवावी. बाहेर जाताना छत्री सोबत ठेवावी. तसेच भिजल्यास कपडे ताबडतोब बदलावी. वृद्धांनी गरम पाणी प्यावे. तसेच हलकं जेवण आणि वेळेवर औषधं घ्यावे. पावसाळ्यात आजारांपासून बचाव होण्यासाठी नियमित हात धुणे, संतुलित आहार घेणे आणि स्वच्छता राखणे महत्त्वाचे आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हळद टाकलेलं दूध, तुळस आणि आल्याचा चहा प्यावा. फळांचं सेवन करावं. वेळेवर झोपणे, योगासने-प्राणायाम करणे, डासांपासून बचावासाठी मच्छरदाणी किंवा मॉस्किटो रिपेलेंटचा वापर करणे, घराजवळ पाणी साचू न देणे आणि कुंड्यांमध्ये पाणी साठू न देणे, घर आणि घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे.

पावसाळ्यात आहाराची काळजी घेणे आवश्यक आहे. आजारांना आमंत्रण मिळू शकते. पालेभाज्या, मशरूम, फुलकोबी, ब्रोकोली, वांगी या भाज्या शक्यतो टाळाव्यात. आर्द्रता व पावसामुळे भाज्या लवकर दूषित होतात. त्यामुळे आरोग्याच्या समस्या वाढू शकतात. पावसाळा सुरू झाला की आहाराची, तब्येतीची काळजी घेणे फार गरजेचे असते. कारण पावसाळ्यातच अनेक आजारांना आमंत्रण मिळते. या ऋतूत चुकीच्या आहाराचे सेवन केल्याने किंवा सतत बाहेरचं खाल्ल्याने उलट्या, जुलाब आणि त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात.

या ऋतूत आहाराची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. पावसाळ्यात बाहेरचे उघडे अन्न खाणे टाळावी, कारण हा ऋतू माश्या आणि डासांच्या वाढीसाठी अनुकूल असतो. पण ब-याच जणांना हे माहित नसेल की पावसाळ्यात काही भाज्यांचे सेवन करणेही आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे या भाज्या पावसाळ्यात शक्यतो न खाण्याचा सल्ला दिला जातो. काही भाज्या पावसाळ्यात विषासारख्या आरोग्यावर परिणाम करतात. या ऋतूत भाज्यांचे सेवन देखील खूप काळजीपूर्वक करावे लागते. एका वृत्तानुसार पावसाळ्यात वाढलेली आर्द्रता आणि पाऊस हे बॅक्टेरिया आणि बुरशीसाठी अनुकूल वातावरण असते. या वातावरणात अन्न दूषित होते आणि रोगांचा धोका देखील वाढतो.

पावसाळ्यात लसूण आणि कांदा यासारख्या भाज्यांचे सेवन देखील कमी केले पाहिजे. हिरव्या पालेभाज्या खाऊ नये. पालक, कोबी सारख्या पालेभाज्या पावसाळ्यात खाऊ नयेत. पावसाळ्यात चिखल, कीटक आणि ओलावा यामुळे या भाज्या लवकर संक्रमित होतात. जर त्या व्यवस्थित स्वच्छ केल्या नाहीत तर त्याचे हानिकारक जंतू आपल्या पोटात जाऊ शकतात, ज्यामुळे आजारी पडण्याची किंवा पोट खराब होण्याची शक्यता असते. मशरूम हे पौष्टिक अन्न आहे, परंतु पावसाळ्यात त्याचे सेवन करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. पावसाळ्यात भरपूर ओलावा असतो, ज्यामुळे मशरूम खूप लवकर कुजण्यास सुरुवात होते. कुजलेल्या मशरूममुळे अन्नातून विषबाधा होऊ शकते. त्याचे सेवन केल्याने पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. पावसाळ्यात मशरूम खूप काळजीपूर्वक खावे किंवा खाणे सरळ टाळावे.

फुलकोबी आणि ब्रोकोली या क्रूसिफेरस कुटुंबातील भाज्या आहेत, ज्या आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत. परंतु पावसाळ्यात त्यांचे सेवन करणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. या भाजीची रचना अशी आहे की त्यात लहान खोबणी असते, ज्यामध्ये पावसाळ्यात ओलावा आणि कीटक सहजपणे अडकतात. या कीटकांना स्वच्छ करणे कठीण होते, कारण फक्त धुवून त्या पूर्णपणे स्वच्छ करता येत नाहीत. जर या भाज्या योग्यरित्या शिजवल्या नाहीत तर पचनसंस्थेला त्रास होऊ शकतो, विशेषतः ज्यांची पचनसंस्था संवेदनशील असते. तसेच वांगी ही सहसा एक चविष्ट आणि पौष्टिकतेने समृद्ध भाजी असते. परंतु पावसाळ्यात ती खाणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. पावसाळ्यात ओलावा आणि मातीमुळे वांग्यांमध्ये लवकर किड लागते, ज्यामुळे विषबाधा किंवा पोटाच्या समस्या उद्भवू शकतात.

*********

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# एसटीचे खासगीकरण फायद्याचे?

एसटी महामंडळाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी महामंडळाचे खासगीकरण करण्याचा विचार सुरू आहे. सरकारने नेमलेली एक समिती यावर पर्याय सांगणार आहे.

काही उद्योग पूर्णपणे तर काही उद्योग अंशतः सरकारच्या अधिपत्याखाली असणे गरजेचे आहे. आपल्या देशात सुरुवातीला उद्योग सरकारी मालकीचे होते. त्या वेळी कुशल मजूर, भांडवल व तंत्रज्ञान खासगी क्षेत्रामध्ये सहज उपलब्ध होत नसल्यामुळे सरकारने स्वतः त्यामध्ये लक्ष घातले. सरकारची प्रथमतः जबाबदारी देशाचे संरक्षण, अंतर्गत सुरक्षा व कायदे कानून बनविणे इत्यादी असते म्हणून सरकारने हळूहळू उद्योग, कारखानदारी इत्यादी मधून आपली हिस्सेदारी कमी करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

सरकारला आवश्यक वाटेल तेव्हा उद्योगावर सरकारी मालकी निर्माण होऊ शकते. सरकारी उद्योग कर्मचार्यांच्या हलगर्जीपणामुळे, भ्रष्टाचारामुळे व बदलत्या सामाजिक मूल्यामुळे तोट्यात चालत आहेत. त्यामुळे खासगीकरण काळाची गरज वाटते. एसटी महामंडळ आर्थिक संकटातून जात आहे. एसटी महामंडळाचा संचित तोट्याचा आकडा १२ हजार ५०० कोटी रुपयांच्या घरात जाऊन पोहोचलेला आहे. महामंडळाने एसटी कर्मचार्यांच्या संपामुळे एसटीचे विलीनीकरण करण्यापेक्षा खासगीकरण होऊ शकते का, यासंदर्भात एका सल्लागार समितीची नियुक्ती केली. खासगी कंपन्यांच्या शिवनेरी बस एसटी महामंडळाच्या सेवेत कार्यरत आहेत तशाच पद्धतीच्या हजार खासगी बस घेऊन एसटी महामंडळाचा तोटा भरून निघू शकतो का या संदर्भात या समितीला त्या पद्धतीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

राज्य परिवहन महामंडळ ही निमसरकारी संस्था आहे. तिचे खासगीकरण केले तर, खासगी कंपन्यांसारखी नोकरीची हमी राहणार नाही ही नेहमी टांगती तलवार राहील, सेवा सुविधा एकवेळ सुधारतील पण कामाची शाश्वती राहणार नाही, असाच काहीसा प्रकार होणार ही भीती कर्मचार्यांच्या मनात आहे. राज्य परिवहन हे लोकाभिमुख न राहता तोट्यातील मार्ग खासगी संस्था बंद करेल आणि खेड्यापाड्याच्या कोपर्यात जाणारी एसटी फक्त पैसे कमावण्यापुरतीच मर्यादित राहील, असे जनतेचे मत आहे.

दुसर्या बाजूने विचार केला तर पूर्णपणे सरकारी सेवा केली तर भलेमोठे १७०० कोटी रुपयांचे झालेले कर्ज किंवा वेळोवेळी वाढणारे कर्ज सरकारलाच फेडावे लागेल. सेवा सुधारेल याची शाश्वती असणार नाही. वाहनांच्या प्रत्येक बारीक सारीक गोष्टींसाठी, खर्चांसाठी, पगार करण्यासाठी फक्त राज्य सरकार जबाबदार असेल व आर्थिक भार वाढेल.

राज्य परिवहन कर्मचार्यांना सरकारी सेवकांसारखे भत्ते, वेतन (आयोग) लागू करणे आणि ते न चुकता देणे, वेळोवेळी वाढवणे गरजेचे आहे. कमी पगारात आजच्या काळात ते आपल्या कुटुंबाच्या गरजा कशा भागवत असतील याचा विचार करून त्यांची पगारवाढ होणे आवश्यक आहे. असे झाले तर विलीनीकरणाची गरजच राहणार नाही; पण महामंडळ तोट्यात आहे आणि कर्मचार्यांचा सहनशक्तीचा अंत झाला. यातून आता सरकारनेच योग्य निर्णय घेऊन त्यांना दिलासा द्यायला हवा.

राज्य परिवहन मंडळाचेच नाही तर सरकारी सर्व कार्यालयांचे खासगीकरण झाले पाहिजे, असाही एक विचार जनमानसांच्या मनात उद्भवताना दिसून येत आहे. कारण ज्या मंडळांचा किंवा कार्यालयांचा जन्मच लोकांची सेवा करण्यासाठी झालाय तिथे काम करणारे कर्मचारी खरंच लोकांची सेवा करताना दिसतात का, हा मोठा प्रश्न आहे. सरकारी कर्मचारी आणि खासगी कर्मचारी या दोघांमधल्या बोलण्याच्या फरकातून खासकीकरणाचा फायदा आपल्या लक्षात येईल. ज्यावेळी खासगीकरण होईल त्यावेळी लोकांना सेवा, गाड्यांचा मेंटेनन्स सगळं वेळेवर होईल अशी अपेक्षा तर नक्की करता येईल.

काम न करता बसून पगार घेणे हे खासगीकरणात शक्य नाही, त्यामुळे मनुष्यबळाचा पूर्ण वापर करून घेता येईल. पण कर्मचार्यांचे पगार, कर्मचार्यांचे हक्क पायदळी तुडविले जातील, हेही खरे. एसटी खासगीकरणाचा विचार करताना एसटीची सेवा अधिक चांगली करता येईल का याचाही विचार व्हावा. हात दाखवला की एसटी थांबावी, एवढ्या साध्या अपेक्षेची पूर्तता बर्याच वेळेस मुंबई-पुणे, नाशिक-पुणे किंवा मुंबई-नाशिकसारख्या बर्याच मार्गांवर होत नाही. उलट काही कर्मचारी बस हळू करून बस थांब्याजवळ उभे राहण्याचा सल्ला देतात.

याउलट कर्नाटक राज्य परिवहन बसेस बर्याच मार्गांवर कुणीही हात जरी दाखवला तरी तिथे बस थांबा असो अथवा नसो थांबतात. असा अनुभव महाराष्ट्र एसटीबद्दल आला तर खूप फरक पडेल, मात्र यासाठी एसटी प्रशासन काहीही प्रयत्न करताना दिसत नाही. महाराष्ट्राअंतर्गत रस्ते फारच खराब आहेत म्हणून वाहनदुरूस्तीचा खर्च वाढतो. प्रवासाला जास्त वेळ लागतो. त्यामुळे प्रत्येक बसच्या सरासरी फेर्या कमी होतात आणि परिणाम म्हणून प्रति बसमागे उत्पन्न कमी मिळते. खराब रस्त्यांमुळे खर्चही वाढतो.

आपण रस्त्यांच्याबाबतीत तामिळनाडू अथवा कर्नाटकशी तुलना केली तर फरक लक्षात येईल. दक्षिणेतील बहुतेक राज्य स्लीपर बस सेवा देतात व त्या खासगी बसच्या तोडीच्या आहेत. कर्नाटकात अनेक राज्यांतर्गत मार्गावर खासगी व एसटीच्या दोहोंच्या बससेवा उपलब्ध आहेत. प्रवासी मिळवण्यासाठी उत्तम सेवा देण्याची त्यांच्यात स्पर्धा चाललेली असते. महाराष्ट्र एसटी बसच्या बॉडी डिझाइनमधे सुधारणा करण्यास बराच वाव आहे, ज्यामुळे ती प्रवाशांना आकर्षक व आरामदायी वाटेल.

# पार्किन्सनचे मोठे आव्हान

अमेरिका, युरोप व इतर ठिकाणी जगामध्ये सर्वसाधारणपणे: ५० लाख लोक पार्किन्सन आजाराने पीडित आहेत. १८१७ साली जेम्स पार्किन्सन नावाच्या डॉक्टराने या रोगाच्या लक्षणांचे निरीक्षण केले. जगामध्ये अल्झायमर या रोगाखालोखाल पार्किन्सनचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळतात. हा रोग पुरुष व स्त्रियांमध्ये समान प्रमाणात आढळतो. जसजसे माणसाचे वय वाढत जाते तसतसे हा रोग होण्याची शक्यता वाढत जाते.



हातामध्ये कंप, शरीराच्या हालचालीमध्ये शिथिलता येणे आणि चालण्या फिरण्याचा वेग कमी होणे, उभे राहिल्यास तोल जाणे, बोलताना तोतरेपणा येणे, अन्न गिळण्यास त्रास होणे, आठवण न राहणे व माणसाला ओळखता न येणे ही काही महत्त्वाची पार्किन्सन या रोगाची लक्षणे आहेत.

मेंदूच्या सबस्टॅनिटिया निग्रा, पार्स कॉम्पॅक्टा, बेसल गँगलिया, पुटामेन तसेच पार्स इंटरना या भागात पेशींमध्ये डिजनरेटिव्ह बदल दिसून येतात. पेट, स्पेक्ट स्कॅनवरती या गोष्टी दिसून येतात. मृत रुग्णांच्या मेंदूच्या वरील भागाच्या पेशींचा सूक्ष्मदर्शीय अभ्यास केल्यानंतर या पेशींमध्ये डोपामाईन कमी असल्याचे आढळून येते. तसेच या पेशींमध्ये डोपामाईन नसल्यामुळे मेंदूपासून शरीराच्या इतर भागांना संवेदना पोहोचविणे कठीण होते. या पेशींचा सूक्ष्म अभ्यास केल्यानंतर पेशी मृत होऊ लागल्याचे दिसून येते.

या पेशींमध्ये काही विचित्र तऱ्हेच्या तारकांसदृश लेव्ही बॉडीज नावाचे कण दिसून येतात. असे कण या पेशींमध्ये दिसणे हे पार्किन्सनच्या रोगाचे निदान करण्याचे एकमेव महत्त्वाचा निकष आहे. लेव्ही बॉडीज या जांभळ्या दिसणाऱ्या बॉडीज असून या मेंदूच्या बसल गंगलियाच्या पेशींमध्ये दिसून येतात. तसेच लेव्ही न्युराइट्स नावाच्या पेशींचा घोळका मेंदूच्या काही भागात दिसून येतो. या रोगाचे निदान हे सहसा रुग्णाला तपासून करणे आवश्यक असते. फार मोठ्या तऱ्हेच्या तपासण्या किंवा चाचण्या या रोगाच्या निदानासाठी लागत नाही. काही डॉक्टर सीटी स्कॅन तसेच पेट स्कॅन किंवा स्पेक्ट स्कॅनची शिफारस रोगाच्या निदानासाठी करतात. मुख्यत्वेकरून मेंदूला इतर कोणताही आजार नाही हे ठरविण्यासाठीसुद्धा या तपासण्यांचा उपयोग होतो. तसेच मेंदूला असलेला रक्तपुरवठा याबाबत या तपासण्यांनी बऱ्यापैकी माहिती मिळते. मेंदूला सूक्ष्म रक्तवाहिनीतून होणारा रक्ताचा पुरवठा या चाचण्यांमुळे कळतो.

कोणत्याही तऱ्हेचा रोग असल्यास रोगाच्या स्थितीप्रमाणे रुग्णाचे उपचार करणे अत्यावश्यक असते. मेंदूच्या पेशींमध्ये डोपामाईनचे प्रमाण कमी झालेले असल्यामुळे लेव्होडोपा या गोळ्या नियमितपणे देण्यात येतात. या गोळ्यांमुळे रक्तदाब कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे काही डॉक्टर्स लेव्होडोपा व कार्बिडोपा या दोन्ही औषधांचे मिश्रण असलेल्या गोळ्या रुग्णांना देतात.

या गोळ्यांमुळे प्रथम काही वर्षं रुग्णाला खूप आराम मिळतो परंतु जसा जसा रोग बळावत जातो तसातसा या गोळ्यांचा उपयोग कमी होऊ लागतो. लघवीला व्यवस्थित न होणे किंवा बद्धकोष्ठता होणे हेसुद्ध बऱ्याच रुग्णांमध्ये दिसून येते. अशा वेळी लघवीसाठी नळी व बद्धकोष्ठतेसाठी बऱ्याच वेळा इनेमा दयावा लागतो. अन्न गिळता न आल्यास रुग्णांना नाकातून टाकलेल्या नळीतून किंवा जठरात टाकलेल्या नळीतून अन्न दयावे लागते. इतर काही त्रास असल्यास त्याप्रमाणे औषध उपाययोजना व मुख्यत्वेकरून फिजिओथेरपी देणे अत्यावश्यक असते. हा रोग हळूहळू वाढत जाणारा रोग असून ३० ते ४० वर्षांत या रोगाची तीव्रता अत्युच्च होते व रुग्ण बेजार होऊन जातो. गिळता न आल्यास तोंडाने अन्न देण्याचा अट्टहास न करणे संयुक्तिक ठरते. मेंदूच्या पेशींमध्ये स्टेम सेल टाकून डोपामाईन निर्माण करणाऱ्या पेशी तयार करण्याचा प्रयत्न स्टिरिओ टॅक्टिक शस्त्रक्रियाने करण्याचा प्रयत्न हा या रोगावर विजय मिळविण्याचा एक मार्ग असू शकेल असे शास्त्रज्ञांना वाटते.

पार्किन्सनचे प्रकार पार्किन्सन या रोगाचे दोन प्रकार असून एका प्रकाराला वैशिष्ट्यपूर्ण पार्किन्सन आजार म्हणतात व दुसऱ्या प्रकारात 'विशिष्ट प्रकारात न बसणारा पार्किन्सन आजार' असतो. बऱ्याच वेळा तरुण वयात होणारा पार्किन्सन हा 'विशिष्ट प्रकारात न बसणारा पार्किन्सन आजार' असू शकतो. 'विशिष्ट प्रकारात न बसणारा पार्किन्सन आजारा'मध्ये कंप पावणे, हाताच्या जोरदार हालचाली होणे इत्यादी गोष्टी दिसून येतात. तरुण वयामध्ये होणारा पार्किन्सन हा आनुवंशिक कारणामुळे होणारा असू शकतो. प्रदूषित हवा, धूम्रपान इत्यादी काही कारणे काही शास्त्रज्ञांनी निर्देशित केलेली आहेत.

# तुम्हालाही उजळ आणि सुंदर त्वचा हवी? डॉक्टरांनी सांगितलेले हे दोन उपाय फक्त लक्षात ठेवा



प्रत्येक महिलेसाठी स्किनकेअर रूटीन फार गरजेचे असते. आपण बरेचदा टाळाटाळ करतो, पण चेहर्याची काळजी घेणे गरजेचे असते. काही जण ब्युटी पार्लरमध्ये जावून महाग अशा ब्युटी ट्रिटमेंट्स घेतात, पण प्रत्येकीच्या चेहऱ्याला ते सूट होतंच असं नाही. शिवाय कितीही नैसर्गिक म्हटले तरी शेवटी ब्युटी प्रोडक्ट्समध्ये रसायने असतातच. सतत अशा ट्रिटमेंट करून घेणे चेहऱ्यासाठी चांगले नाहीच, पण खिशासाठीही नाही. डॉ. जुष्य भाटिया सरीन यांच्या मते, उजळ त्वचेसाठी तुम्हाला फक्त दोन टिप्स फॉलो करायच्या आहेत. दरम्यान, नवी दिल्ली येथील कॉस्मेटिक त्वचारोगतज्ज्ञ डॉ. आकृती गुप्ता यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

१) एक्सफोलिएशन ग्लायकोलिक किंवा लॅक्टिकसारख्या अल्फा हायड्रॉक्सी ॲसिडचा वापर आठवड्यातून दोन-तीन वेळा ६-१२ टक्के केल्याने तुमचा चेहरा उजळू शकतो. कारण ते त्वचेचा रंग टिकवून ठेवणाऱ्या त्वचेच्या पेशींचा अतिरिक्त थर काढून टाकतात, असे डॉ. सरीन म्हणाले. डॉ. सरीन यांनी नमूद केले की, लॅक्टिक ॲसिड हे कोरड्या त्वचेच्या लोकांसाठी एक उत्तम उत्पादन आहे. विशेषतः प्रौढ त्वचा असलेल्यांसाठी हे फायदेशीर आहे.

२) आहार डॉ. सरीन म्हणाले की, महिलांनी त्यांच्या त्वचेची काळजी घेण्यासोबतच त्यांच्या अन्नात अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण वाढवावे. तुमच्या आहारात तुम्ही भरपूर फळेदेखील समाविष्ट करू शकता, असे डॉ. सरीन म्हणाल्या. डॉ. सरीन यांच्याशी सहमती दर्शवत, जिविषा क्लिनिक, नवी दिल्ली येथील कॉस्मेटिक त्वचारोगतज्ज्ञ डॉ. आकृती गुप्ता म्हणाल्या, हो, एक्सफोलिएशन आणि अँटीऑक्सिडंट्स दोन्हीही चमकदार त्वचा मिळविण्यास मदत करू शकतात.

ग्लायकोलिक ॲसिड किंवा लॅक्टिक ॲसिड वापरल्याने मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यास मदत होते, ज्यामुळे त्वचेचा रंग नितळ आणि अधिक तेजस्वी होतो.

# कानडी रोड सिमेंट रस्त्याचे काम नियमाप्रमाणे करावे अन्यथा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

केज / प्रतिनिधी

कानडी रस्ता ३३ फुटांचा आहे. शाहिद रामदास गायकवाड चौक ते मेन रोड सिमेंट रस्त्याचे काम २० ते २५ फूट रुंदीचेच चालू आहे. काही राजकीय पुढाऱ्यांकडून सांगण्यावरून हे काम सुरू आहे.

कानडी रोड वरील अतिक्रमण काढून हा रस्ता ३३ फुटाप्रमाणे करण्यात यावा ही अन्यथा रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा

अविनाश काळे, प्रेम गायकवाड, लक्ष्मण जाधव. रवी डुकरे,संदीप भुतडा व इतर नागरिकानी निवेदनाद्वारे दिला आहे.



# तलाठी, मंडळअधिकारी कृषीसहाय्यक,कृषी मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात तरी मुख्यालयावर राहण्याचे आदेश द्या - भाई मोहन गुंड

## शंभर पन्नास किलोमीटर वरून नोकऱ्या करतात अधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे शेकापची तक्रार.

**जिल्ह्यात अधिकाऱ्यांना वेळेच बंधन नाही, आयाराम गयाराम सारखी नौकरी केली जाते, सर्वसामान्य माणसांना वेठीस धरले जाते, अधिकारी एवढे मगरू बनत चाललेले आहेत, कुठल्या तरी पुढार्याचे हस्तक होऊन काम करतात अधिकार्यानी आपन सामान्य लोकांचे नौकरी याचे भान ठेवावे, हालगर्जीपना खपवून घेणार नाही. -भाई मोहन गुंड**




केज (प्रतिनिधी) -कृषी क्षेत्रामध्ये महत्त्वाचे अधिकारी म्हणून तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी, ग्रामसेवक हे शासकीय यंत्रणेतले प्रमुख महत्त्वाचे घटक अधिकारी आहेत. मात्र हे अधिकारी आपल्या नेमणूक झालेले तलाठी, मंडळ अधिकारी सज्जावर तर कृषी सहाय्यक मंडळ अधिकारी मंडळात, ग्रामसेवक मुख्यालयात राहातं नाहीत. पावसाळ्याचे दिवस आहेत कधीही नैसर्गिक आपत्तीचे निर्माण होऊ शकते, म्हणून सदरील अधिकाऱ्यांनी आपल्या नेमुन दिलेल्या मुख्यालयात मुक्कामी रहावे अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी केली आहे.बीड जिल्ह्यामध्ये एक ही तलाठी, मंडळाधिकारी आपल्या सज्जावर राहत नाही, स्वतः चे खाजगी रायटर आफीसला बसवलेले असतात आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्यापूर्त येतात, सर्व कार्यालय शहरांमध्ये थाटलेले आहेत, आयाराम गयाराम सारखा प्रकार तलाठी मंडळाधिकाऱ्यांचा आहे. कृषी विभागाचे अधिकारी असून नसल्यासारखे आहेत कधीच कार्यालयामध्ये दिसत नाहीत, कार्यालय मध्ये गेलं तर त्यांचे संबंधित विभागाला स्वतःच्या मोबाईल नंबर शेतकऱ्यांना दिसतील असे लिहीले नाहीत, आवश्यक अधिकाऱ्याची विचारणा केली तर साहेब साइटवर गेले म्हणून सांगतात वेळ मारून नेहतात अशा पद्धतीचा कारभार कृषी विभागाचा चालतोय. ग्रामसेवक तर गावात जातच नाहीत पंचायत समीतीत बसुन काम करतात. अनेक कृषीसहाय्यक, कृषी मंडळाधिकारी, तलाठी, मंडळअधिकारी. ग्रामसेवक मुख्यालया पासुन ५० /१०० किलोमीटर अंतरावरुन येऊन नौकरी करतात. नैसर्गिक आपत्ती झाली यांना दुसऱ्या दिवशी कोणाच्यातरी सांगण्या वरून बातमी बघुन कळते रात्री गावाकडे पाऊस झाला, मग येणार पंचनामा करायला अशी परिस्थिती आहे, यामुळे किमान नैसर्गिक आपत्तीचा काळ पाहता महसुल विभाग, कृषी विभाग खूप महत्त्वाचा विभाग आहे यामुळे त्यानी आपल्या मुख्यालयावर तात्काळ राहावे असे आदेश जिल्हाधिकारी यांनी द्यावेत जो अधिकारी मुख्यालयात राहात नाही आशा कर्मचारी अधिकार्यावर कारवाई करावी असे लेखी पत्र शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड, ड गोले पाटील,भाई अशोक रोडे, भाई अर्जुन सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांना निवाशी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिले आहे.

# जीवाचीवाडी येथील ग्रामविकास अधिकारी यांनी शासनाची दिशाभूल करून शासन निर्णयाचा केला अवमान-अश्रुबा खरात

केज/प्रतिनिधी




केज तालुक्यातील जीवाची वाडी येथील ग्रामविकास अधिकारी यांनी शासनाची दिशाभूल करून शासन निर्णयाचा अवमान करून स्वतःचे काळे बाजार झाकण्यासाठी दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेला ठराव हा कायदेशीर रित्या अवैध आहे या आशयाची लेखी तक्रार गट विकास अधिकारी केज यांच्याकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे केज तालुका अध्यक्ष आश्रुबा खरात यांनी केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील जीवाची वाडी येथील ग्रामविकास अधिकारी यांनी शासनाची दिशाभूल करून शासन निर्णयाचा अवमान करून स्वतःचे काळे बाजार झाकण्यासाठी दिनांक २० फेबरवारी २०२५ रोजी दिलेला ठराव हा कायदेशीररित्या अवैध आहे. सदरील ग्रामविकास अधिकाऱ्यावर आयपीसी कलम ४२० अंतर्गत कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे, ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेला ठराव हा अवैध असून तो ठराव रद्द करण्यात यावा, सदरील प्रकरणावर गटविकास अधिकारी यांनी आठ दिवसात योग्य ती कारवाई न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ ए पक्षाच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल. ग्रामविकास अधिकारी यांनी शासनाची दिशाभूल करत शासन निर्णयाचा अवमान करून स्वतःचे काळे बाजार झाकण्यासाठी दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेला ठराव हा कायदेशीर रित्या अवैध आहे. तो असा की, सदर घेण्यात आलेल्या ठरावा संदर्भात महाराष्ट्र शासनाचा आदेश दिनांक १९ मे २०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. या कारणे ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत यांनी दिलेला ठराव हा अवैध्य असून तो ठराव रद्द करण्यात यावा असे लेखी निवेदनात म्हटले आहे जर सदर प्रकरणी गटविकास अधिकारी यांनी आठ दिवसात योग्य ती कारवाई न केल्यास पक्षाच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा प्रशासनास इशारा देण्यात आला आहे. या लेखी निवेदनावर केज तालुकाध्यक्ष आश्रुबा खरात, आदेश देशमुख,प्रकाश सत्वधर, नवनाथ सोनवणे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करावे-रोहित कसबे

केज/प्रतिनिधी



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची विटंबना एका प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून झाली आहे. उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय चाकूर जि. लातूर या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून अण्णाभाऊ साठे यांचे प्रतिमा चक्क कार्यालयाच्या खिडकीत उलटी लावून तमाम महाराष्ट्रातील जनतेचा व मातंग समाजाच्या अस्मितेचा आव्हान केला आहे या घटनेने समस्त मातंग समाजात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकार हा त्वरित दुरुस्त करून संबंधित कार्यालयाचे अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अन्यथा समस्त मातंग समाज बांधवांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील असे लेखी निवेदनात म्हटले आहे. सदर मागणीचे लेखी निवेदन हे केज तहसीलदार यांना दलित अन्य अत्याचार निर्मूलन समिती व सकल मातंग समाज संघर्ष समिती यांच्या वतीने देण्यात आले आहे. या लेखी निवेदनावर रोहित कसबे, चंद्रकांत खरात सर, लखन हजारे, शरद धीवार, तात्या गवळी, गोविंद लांडगे, राहुल तांदळे, अल्ताफ सय्यद यांच्यासह समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शरीरात साचलीय भयंकर साखर अन् डायबिटीज होण्याच्या वाटेवर आहात? ही १० लक्षणं देतात इशारा; घरीच करा स्वत:ची सोपी टेस्ट

सध्या शरीरात साचणाऱ्या साखरेचा सगळ्यांनीच धसका घेतला आहे. आजकाल रील्स, व्हिडीओजमध्येही आपण पाहतो की, साखर जास्त खाल्ल्याने काय काय दुष्परिणाम होतात. त्यामुळे प्रत्येक जण गोड खाताना १० वेळा विचार करतो. पण, असे अनेक पदार्थ आहेत, ज्यामध्ये साखर खूप असते; पण आपल्याला त्याबाबत माहीतच नसते. चहा, कॉफी, सोडा, फास्टफूड यांसारखे पदार्थ तर असे आहेत की, ज्यातून आपण मोठ्या प्रमाणात साखरेचे सेवन करीत असतो आणि ती आपल्या आरोग्याला हानी पोहोचवतेय हे आपल्या लक्षातच येत नाही.

विशेषतः तरुण पिढीमध्ये साखर खाण्याचे प्रमाण जास्त वाढले आहे. परंतु, साखरेच्या अति सेवनामुळे शरीरात अशी काही लक्षणे दिसू लागतात, जी आपल्याला सतर्क करतात. चला तर मग जाणून घेऊ जास्त साखर सेवन केल्यामुळे शरीरात कोणती लक्षणे दिसतात आणि त्यातून आपल्या आरोग्याला काय धोके होऊ शकतात. जेव्हा रक्तातील साखरेचे प्रमाण खूप जास्त असते; विशेषतः २५० मिलिग्रॅम/डीएलपेक्षा जास्त असते, तेव्हा तुमचे शरीर धोक्याची चिन्हे दाखवू लागते. ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध संचालक डॉ. अमित सराफ यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. डॉ. अमित सराफ म्हणाले की, उच्च रक्तातील साखर किंवा हायपर ग्लायसेमिया बहुतेकदा हळूहळू विकसित होते आणि जर तुम्हाला धोक्याची चिन्हे माहीत नसतील, तर ते दुर्लक्षित केले जाऊ शकते. ही लक्षणे हळूहळू येऊ शकतात आणि सुरुवातीला दुर्लक्षित केली जातात, असे झांड्रा हेल्थकेअरचे मधुमेहशास्त्र प्रमुख व रंग दे नीला इनिशिएटिव्हचे सह-संस्थापक डॉ. राजीव कोविल यांनी सांगितले.

काही सामान्य लक्षणे खालीलप्रमाणे : वारंवार लघवी होणे- जेव्हा साखरेची पातळी जास्त असते तेव्हा तुमचे मूत्रपिंड जास्त ग्लुकोज काढून टाकण्यासाठी जास्त वेळ काम करतात, ज्यामुळे वारंवार लघवीला जाण्याची शक्यता वाढते. सर्वांत सामान्य लक्षणांपैकी एक म्हणजे खूप तहान लागणे. तुम्ही कितीही पाणी प्यायलात तरी कोरडेपणा कायम राहतो. त्यानंतर वारंवार लघवी होते; विशेषतः रात्री लघवीसाठी जागे व्हावे लागते, असे डॉ. कोविल म्हणाले.

# लातूर येथे सामाजिक न्याय दिन विविध उपक्रमांना साजरा






लातूर :– राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात येते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीचे औचित्य साधून समाज कल्याण विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत समता दिंडी काढून या कार्यक्रमांना सुरुवात झाली. तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी आणि समाज कल्याण सहायक आयुक्त विलास केंद्रे यांनी समता दिंडीला हिरवी झेंडी दाखविली. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे वृक्षारोपण करण्यात आले. प्रादेशिक उपायुक्त कार्यालयाचे वित्त व लेखा सहायक संचालक पी. व्ही. डाके यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे सामुहिक वाचनाने सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण सहायक आयुक्त विलास केंद्रे यांनी केले. यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृह व निवासी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. सुधीर अनवले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी लोककल्याणकारी लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक न्यायाचे मूर्तिमंत उदाहरण होते, तसेच त्यांच्या कार्य कर्तृत्वाची प्रेरणा पिढ्यान पिढ्या आपणांस ऊर्जा व सामाजिक न्यायाची जाणिव देत राहील, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यासह समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन लामजना शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. मुखम यांनी केले. तालुका समन्वयक नागेश जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले

## शक्तीपीठ महामार्ग : भूसंपादनाला मंजुरी, पण राज्य कर्जबाजारी होणार; वित्त विभागाचा धक्कादायक अहवाल

नुकतेच राज्याच्या महत्वकांशी अशा शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंजरी देण्यात आली आहे. यामुळे आता भूसंपादनाच्या प्रक्रियेला वेग येणार असून, अशातच वित्त विभागाचा धक्कादायक अहवाल समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाच्या अहवालाचे टायमिंग राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

शक्तीपीठ महामार्ग उभारण्यासाठी जो पैसा लागणार आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवरील कर्जाचा बोजा प्रचंड वाढेल, असे वित्त विभागाच्या अहवालात म्हटले आहे. शक्तीपीठ प्रकल्पासाठी राज्याचे २०७८७ कोटी रुपयांचे उच्च आर्थिक दायित्व आहे. परिणामी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार, मार्च २०२६ पर्यंत राज्य सरकारवर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्जाचा बोजा येणार असल्याचा अभिप्राय या अहवालात नोंदविण्यात आला आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अर्थमंत्री असून त्यांच्याजवळ वित्त विभाग आहे. या विभागाने शक्तीपीठ महामार्गासंदर्भात दिलेल्या अहवालाबाबत आता महायुतीमधील नेते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. सरकारने या महामार्गाच्या भूसंपादनाला दिलेल्या मुंजरीमुळे अनेक नेत्यांनी विरोधही दर्शविला आहे. शेतकरी नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी यास विरोध दर्शविला आहे. असा आहे शक्तीपीठ महामार्ग नागपूर ते गोवा जोडणारा शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्रातील सर्वात लांब सहापदरी द्रुतगती मार्ग आहे. याची लांबी ८०२ किलोमीटर असून, तो महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतून आणि गोव्यातील एका जिल्ह्यातून जातो. हा मार्ग तीन शक्तीपीठे, दोन ज्योतिर्लिंगे आणि इतर १९ धार्मिक स्थळांना जोडतो, ज्यामुळे याला 'शक्तीपीठ महामार्ग' असे नाव देण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास संस्थेचे कर्मचारी सामूहिक रजेवर

मुंबई :– महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी श्री रामदास बर्डे, जिल्हाध्यक्ष अहिल्यानगर हे आझाद मैदान मुंबई येथे कंत्राटी कर्मचारी नियमित वेतन वाढ व विविध मागण्यांसंदर्भात आमरण उपोषणास बसलेले आहेत महाराष्ट्रभरातील सर्व जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना /मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी श्री रामदास बर्डे यांना पाठिंबा देण्यासाठी पूर्ण राज्यभरातून सामूहिक रजेवर जात आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना हे अत्यंत महत्त्वाच्या योजना राज्याच्या ग्रामविकास विभाग मंत्रालयातर्फे राबविण्यात येतात मात्र या कामासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली असून या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन हे अत्यंत अत्यंत तूटपूंजी आहे तसेच या कर्मचाऱ्यांना ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना सुविधा मिळतात त्या मिळत नाही हे कंत्राटी कर्मचारी मागील सतरा वर्षापासून या योजनेमध्ये काम करत आहे मात्र राज्यशासनाने या कर्मचाऱ्यांचे मिळणारे मानधन यामध्ये २०१८ पासून कसल्या ही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. शासनाच्या या आडमुठे धोरणामुळे ग्रामीण भागाच्या विकासासाठी अहोरात्र झटणारे या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी श्री रामदास बर्डे हे प्राणांतिक उपोषणासाठी आझाद मैदान मुंबई येथे बसलेले आहेत त्यांना पाठिंबा देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी आता वज्र मूठ आवळलेली आहे.

कर्मचाऱ्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामीण भागाच्या विकासावर विपरीत परिणाम होणारअसल्याचे या विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी याबाबत शासनास अवगत केले आहे. तसेच या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष तसेच कर्मचारी संघटनांनी पाठिंबा दिलेला आहे

# मनपाच्या आरोग्य विभागाचा आयुक्तांनी घेतला आढावा

### नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न– आयुक्त मानसी मॅडम



लातूर /प्रतिनिधी : – २६ जून रोजी आरोग्य विभागाचा सर्व वैद्यकीय अधिकारी यांचा आरोग्य विभागातील योजना उपक्रम व नागरिकांना देत असलेले सुविधांचा आढावा आयुक्त मानसी (भा.प्र.से) यांनी घेतला आहे . यावेळी उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांची उपस्थिती होती. सर्व वैद्यकीय अधिकारी यांचा आढावा घेऊन चांगले कामकाज असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहित करून नावीन्यपूर्व कार्यक्रम राबविण्यात बाबत सूचना देण्यात आल्या. काम कमी असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना काम वाढविण्याबाबत सूचित केले.यामध्ये गरोदर माता यांची आरोग्य तपासणी वाढविण्याचे आयुक्त मानसी मॅडम यांनी सूचित केले. ० ते ५ वर्षापर्यन्तच्या बालकांचे पूर्ण लसीकरण करून घेण्याबाबत सूचना दिल्या. तसेच उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी कल्पनेतून सर्व लातूर शहरातील वार्डामध्ये दरमहा आरोग्य शिबीर व मासिक पाळी दरम्यान घ्यायची काळजी याबाबत जनजागृती सुरू केले आहे ते दोन्ही उपक्रम प्रभावीपणे राबविणे बाबत सर्व वैद्यकीय अधिकारी यांना आदेशीत करण्यात आले. तसेच चशर्पीीीरश्र कूसळपश बाबत सर्वांना मार्गदर्शन करून या बाबत सर्व महिलाना व किशोरवयीन मुलींना याबाबत माहिती देऊन आरोग्य सुधारण्याबाबत सूचना देण्यात आल्या. यापुढे दरमहा महानगरपालिकेच्या शाळा मधील सर्व विधार्थीची आरोग्य तपासणी करण्याबाबत आयुक्त मानसी मॅडम यांनी निर्देश दिले या बैठकीस वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ रामेश्वर कलवले, व सर्व वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य परिचारिका,सार्वजनिक आरोग्य व्यवास्थापक व स्टाफ आरोग्य विभाग इत्यादी उपस्थित होते

## मंत्री दादा भुसे राज ठाकरेंच्या भेटीला शिवतीर्थ निवासस्थानी

राज्यात पहिलीपासून हिंदी भाषेच्या अंमलबजावणीवरून वाद सुरू आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पहिलीपासून शाळांमध्ये हिंदी सक्तीच्या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे.

यातच आज शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेण्यासाठी शिवतीर्थ निवासस्थानी दाखल झाले आहेत. हिंदी सक्तीबाबत दादा भुसे राज ठाकरेंची समजूत काढण्याचा प्रयत्न करणार आहेत. यावेळी मंत्री दादा भुसेंसह शिक्षण खात्यातील सर्व अधिकारी राज ठाकरेंना हिंदी भाषा सक्तीबाबत माहिती देणार आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये अर्ध्या तासापासून चर्चा सुरु आहे.




लातूर शहर महानगरपालिका लातूर अतिक्रमण विभागाचे प्रमुख प्रमुख स्वच्छ्ता निरीक्षक
रवि कांबळे यांना वाढदिवसानिमित्त अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर
यांनी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन दिल्या शुभेच्छा

## साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



लातूर : येथील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (ता.२६) जातीव्यवस्थेविरुद्ध लढा उभारून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य रुजविणाऱ्या छत्रपती शाहू महाराज म्हणजेच यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांची १५१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, शाहू महाराजांच्या दूरदृष्टी आणि सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी शाहू महाराजांनी शिक्षण, समानता आणि दुर्बळ घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे महत्त्व सांगितले. छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. त्यांचे कार्य आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे, असे शेख यांनी नमूद केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित भाषणे सादर केली..




लातूर शहर महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त मानसी मिना व उपयुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे पाटील यांनी आज राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त लातूरच्या नांदेड रोडवर असलेल्या राजे छत्रपती शाहू महाराज चौकातील पूर्णाकृती पुतळा राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी लातूर महानगरपालिकेतील सर्व अधिकार कर्मचाऱ्यासह चंद्रकांत चिकटे मोहन माने सह जयंती उत्सव समिती चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्यावा – भिक्खू पय्यानंद थेरो






लातूर :– राजकारण, समाजकारण आणि शिक्षण यांचा त्रिवेणी संगम असलेले लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे खरे अर्थाने भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार होते. महाराष्ट्राच्या मातीत ज्या थोर पुरुषांनी सामाजिक समतेचा आणि न्यायाचा दीप प्रज्वलित केला, त्यात अग्रक्रमाने नाव घेतले जाते ते राजर्षी शाहू महाराज यांचे. त्यांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचले. त्यांच्याच कार्याला उजाळा देत भिक्खू पय्यानंद थेरो यांनी लातूरमध्ये शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त झालेल्या भव्य कार्यक्रमात ठामपणे मागणी केली की, राजर्षी शाहू महाराज यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मानाने गौरविण्यात यावे.

आजच्या दिवशी लातूर शहर साक्षीदार ठरले एका वैचारिक आणि सांस्कृतिक जागृतीच्या मिरवणुकीचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून निघालेल्या या भव्य दिव्य मिरवणुकीने समतेचा झेंडा हाती घेतला होता. ज्येष्ठ नागरिक विचार मंच आणि शाक्य सिंह माता भिमाई सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ही मिरवणूक आयोजित करण्यात आली होती.

मिरवणूकीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण आणि त्रिसरण–पंचशीलने झाली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले. भिक्खू पय्यानंद थेरो पुढे बोलताना म्हणाले की, शाहू महाराज हे केवळ एक शासक नव्हते, तर ते समाजमनाचे शिल्पकार होते. १९०२ मध्ये ५०% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला. शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे हे ओळखून त्यांनी मोफत शिक्षण, विद्यार्थी वसतीगृहे, रुग्णालये आणि सामाजिक संस्थांची उभारणी केली.

आज भारतात अनेकांना भारतरत्न मिळाले, पण ज्यांनी लाखो–कोटींच्या जीवनात उजेड आणला अशा शाहू महाराजांचा अद्याप गौरव झालेला नाही. म्हणूनच आम्ही भारत सरकारकडे मागणी करतो की त्यांना मरणोत्तर देशाचा सर्वोच्च पुरस्कार भारतरत्न देण्यात यावा.

तसेच, त्यांनी सुचवले की शाहू महाराजांची जयंती ही फक्त एक साजरी करणारी तारीख न राहता, सामाजिक प्रेरणेचा दिवस व्हावा. यासाठी एक दिवसाची सार्वजनिक सुट्टी जाहीर व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

हा कार्यक्रम केवळ एक मिरवणूक नव्हती, ती होती इतिहासाच्या न्यायासाठीचा जागर. लोकशाही, समता, शिक्षण, आरक्षण यांसाठी ज्यांनी सर्वस्व अर्पण केले त्या शाहू महाराजांच्या स्मृतींना एक सामूहिक वंदना होती. या प्रसंगी केशव कांबळे, सूर्यभान लातूर कर, त्र्यंबक कवठेकर, मोहन सोनकांबळे, राहुल शाक्यमुनी, मिलिंद धावारे ई. सह धम्म सेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE